मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य

## महापौर रवि लांडगे यांचे प्रशासनाला सतर्कतेचे निर्देश, पूरप्रवण भाग, धोकादायक झाडे व विद्युत धोक्यांवर तातडीच्या कारवाईच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांच्या जीवित सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत महानगरपालिका प्रशासनाला संपूर्ण सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत.





महापौर लांडगे यांनी आज महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शहरातील सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील पाणी साचणारी ठिकाणे, नाले, सबवे, पूरप्रवण भाग, धोकादायक झाडे, जीर्ण संरचना, रस्त्यांची स्थिती तसेच आपत्कालीन यंत्रणेची सज्जता याबाबत माहिती घेत आवश्यक त्या सूचना दिल्या.

यावेळी त्यांनी सर्व क्षेत्रीय अधिकारी, विभागप्रमुख आणि आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित यंत्रणांनी २४ तास सतर्क राहून प्रत्यक्ष क्षेत्रात उपस्थित राहावे, नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी आणि कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश दिले. विशेषतः उघडे मॅनहोल, पाणी साचणारी ठिकाणे, धोकादायक झाडे, विद्युत धोक्याची ठिकाणे तसेच नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकणाऱ्या प्रत्येक बाबीवर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महापौरांनी स्पष्ट केले की, प्रशासनाने केवळ तक्रारींची वाट न पाहता संभाव्य धोके ओळखून आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. नागरिकांच्या जीवाशी संबंधित कोणतीही बाब अत्यंत गांभीर्याने हाताळावी आणि कोणत्याही परिस्थितीत निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही.

यावेळी त्यांनी नागरिकांनाही आवश्यक नसल्यास पावसादरम्यान घराबाहेर पडणे टाळावे, पाणी साचलेल्या रस्त्यांवरून अथवा उघड्या नाल्यांच्या परिसरातून जाणे टाळावे, विद्युत खांब, तुटलेल्या तारा किंवा धोकादायक झाडांच्या परिसरापासून दूर राहावे तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती अथवा धोका निदर्शनास आल्यास तात्काळ महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्ष अथवा संबंधित क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहन केले.

याबाबत महापौर रवि लांडगे म्हणाले, "नागरिकांच्या जीवापेक्षा महत्त्वाचे काहीही नाही. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून काम करावे, संभाव्य धोके वेळेत दूर करावेत आणि कोणत्याही नागरिकाच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही, याची शंभर टक्के दक्षता घ्यावी. सुरक्षित पिंपरी-चिंचवड हेच आपल्या सर्वांचे सामूहिक उत्तरदायित्व आहे."

# सांगवी जिल्हा रुग्णालयाचे 'सुपर स्पेशालिटी'त रूपांतर होणार : आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांची ग्वाही

## आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांची ग्वाही, आमदार शंकर जगताप यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी जिल्हा रुग्णालय अधिक सक्षमपणे चालवण्यासाठी आणि या ठिकाणी उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. या पार्श्वभूमीवर राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांनी शनिवारी रुग्णालयाला प्रत्यक्ष भेट देऊन सोयी-सुविधांची पाहणी केली. आगामी काळात सांगवी जिल्हा रुग्णालयाचे रूपांतर 'सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये केले जाईल, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही त्यांनी यावेळी दिली. रुग्णालयातील यंत्रसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून ती अधिक गतिमान करण्यासाठी आमदार जगताप यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले



> पिंपरी-चिंचवड तसेच लगतच्या ग्रामीण परिसरातील सर्वसामान्य, गरीब रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरांमध्ये किंवा महागड्या खाजगी रुग्णालयांमध्ये जावे लागू नये, हे आमचे स्वप्न आहे. आज आरोग्यमंत्र्यांनी सांगवी रुग्णालयाची पाहणी करून या रुग्णालयाला 'सुपर स्पेशालिटी' दर्जा देण्याची जी ग्वाही दिली आहे, बद्दल मी त्यांचा आभारी आहे. यामुळे हृदयरोग, किडनी आणि मेंदूविकारासारख्या गंभीर आजारांवर गोरगरिबांना मोफत आणि दर्जेदार उपचार मिळतील. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'आत्मनिर्भर आणि सुदृढ भारत' या स्वप्नाला अनुसरून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस महाराष्ट्रात आरोग्याच्या सोयी-सुविधा बळकट करण्यासाठी प्रयत्नशील आहेत." याच कटीबद्धतेसह आम्ही काम करत आहोत.
>
> **- शंकर जगताप आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ**

सांगवी जिल्हा रुग्णालयामध्ये शनिवारी डॉ. प्रकाश अबिटकर यांनी भेट दिली. यावेळी आमदार शंकर जगताप यांनी त्यांना रुग्णालयातील परिस्थितीचा आढावा दिला. यावेळी आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, सहसंचालक डॉ.सुनिता गोलाईत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने उपस्थित होते. रुग्णालयातील आरोग्य सेवा, रुग्ण सुविधा, औषधसाठा, तसेच उपचार व्यवस्थेचा यावेळी त्यांनी सविस्तर आढावा घेतला. विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थिती जाणून घेतली तसेच आवश्यक सुधारणा व तातडीच्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या.

यावेळी बोलताना डॉ. आबिटकर म्हणाले, "सांगवी जिल्हा रुग्णालयात सध्या पुरेशा प्रमाणात आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध आहे. ही यंत्रसामग्री अधिक प्रभावीपणे आणि गतिमान पद्धतीने रुग्णांच्या सेवेत कशी वापरता येईल, यासाठी आमदार शंकर जगताप यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातील. रुग्णालयाचा दर्जा उंचावून सामान्य माणसाला खाजगी हॉस्पिटल्सच्या तोडीस तोड मोफत आणि दर्जेदार उपचार मिळवून देणे हेच आमचे ध्येय आहे."

# मावळातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच पवना थेट जलवाहिनी प्रकल्प!

## शेतकरी, भूमिपूत्र संघटनांच्या प्रतिनिधींसोबत लवकरच स्वतंत्र बैठक, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या बैठकीनंतर आमदार लांडगे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणाऱ्या महत्त्वाकांक्षी पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाबाबत मावळातील शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांना पूर्ण विश्वासात घेतल्याशिवाय प्रकल्प पुढे नेऊ नये, अशी ठाम भूमिका आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मांडली. त्यानंतर मुख्यमंत्री महोदय यांनी पुढील आठवड्यात शेतकरी व संघटनांच्या प्रतिनिधींसोबत स्वतंत्र बैठक घेऊन त्यांच्या सर्व न्याय्य मागण्यांवर चर्चा करूनच अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.



### मुख्यमंत्री फडणवीस काय म्हणाले?

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, "हा प्रकल्प भविष्यासाठी आवश्यक आहे. मात्र शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण करूनच पुढे जाऊ. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही," असे स्पष्ट करत आंदोलनात जखमी झालेल्या १२ शेतकऱ्यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेत नोकरी देण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच पुनर्वसन, नुकसानभरपाई आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या सर्व बाबींवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. तसेच, प्रकल्पामुळे बाधित शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करून त्यांचे पुनर्वसन प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील.

पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाबाबत विधान भवन, मुंबई येथे झालेल्या या बैठकीत प्रकल्पातील प्रशासकीय, तांत्रिक, आर्थिक आणि कायदेशीर अडथळ्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह मावळ आणि पिंपरी-चिंचवडमधील प्रमुख लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, पुणे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जलसंपदा विभाग, नगरविकास विभाग, महसूल विभाग, रेल्वे, एमएसआरडीसी, महावितरण, पीएमआरडीए आणि इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शहराची वाढती लोकसंख्या, पवना नदीतील वाढते प्रदूषण आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता प्रकल्प अत्यंत आवश्यक असल्याचे मान्य करतानाच, बाधित शेतकऱ्यांच्या हितालाही तितकेच प्राधान्य दिले जाईल, अशी भूमिका राज्य शासनाने स्पष्ट केली.

> "२०११ मध्ये पवना थेट जलवाहिनी प्रकल्पाच्या विरोधात झालेल्या आंदोलनात तीन शेतकऱ्यांना हौतात्म्य पत्करावे लागले, तर १२ शेतकरी जखमी झाले. भविष्यात अशी संवेदनशील आणि दुर्दैवी परिस्थिती पुन्हा निर्माण होता कामा नये. कोणत्याही परिस्थितीत मावळातील शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात घेतल्याशिवाय हा प्रकल्प पुढे नेला जाणार नाही. त्यामुळे विविध शेतकरी संघटना, स्थानिक संस्था आणि ग्रामस्थांनीही हा प्रकल्प संघर्षाच्या नव्हे, तर सर्वसमावेशक आणि न्याय्य भूमिकेतून पाहावा. संवादातून मार्ग काढत शेतकऱ्यांचे हित अबाधित ठेवूनच पिंपरी-चिंचवडच्या भविष्यातील जलसुरक्षेचा प्रश्न सोडविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य शासनाचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांच्या बैठकीनंतर पुढील दिशा स्पष्ट होईल."
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

बैठकीत आमदार महेश लांडगे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या मागण्यांना आमचा कोणताही विरोध नसून, शेतकऱ्यांच्या मागण्या, पुनर्वसन आणि स्थानिकांच्या भावना यांचा सन्मान राखूनच प्रकल्पाची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी केली. जोपर्यंत शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत प्रकल्पाचे काम सुरू करु नये. शेतकऱ्यांनी आंदोलन किंवा वादाची भूमिका घेवू नये. गेल्यावेळी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि शेतकरी यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव होता. त्यामुळे या प्रकल्पाला वेगळे वळण लागले. मात्र, यावेळी तसे होणार नाही. प्रत्येक घटकाने हा प्रकल्प शेतकरी, भूमिपुत्रांबाबत सहानुभूती आणि व्यापक लोकहिताच्या दृष्टीने पहावा, असे आवाहनही त्यांनी केले.

# पर्यावरण संरक्षणासाठी एसटीपी अनिवार्यच; पिंपरी चिंचवड चाकण हाऊसिंग सोसायटी संघटनेची भूमिका

## एसटीपीला विरोध करणाऱ्या कोणत्याही संघटना, महासंघ किंवा गटाला ठाम विरोध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड चाकण हाऊसिंग सोसायटी संघटना (PCCHSS) ने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) संदर्भात आपली अधिकृत भूमिका स्पष्ट करत म्हटले आहे की, पर्यावरण संरक्षणासाठी एसटीपी अनिवार्य असून, एसटीपी स्थापनेला विरोध करणाऱ्या कोणत्याही संघटना, महासंघ किंवा गटाच्या भूमिकेला पीसीसीएचएसएसचा ठाम विरोध आहे.

PIMPRI-CHINCHWAD CHAKAN
HOUSING SOCIETY SANGATHAN

> "आम्ही निसर्गमातेच्या बाजूने आहोत. इंद्रायणी नदीची पूजा करायची आणि त्याच नदीत अशुद्ध सांडपाणी सोडायचे, ही दुटप्पी भूमिका आम्हाला मान्य नाही. एसटीपीला विरोध करणारी कोणतीही संघटना पर्यावरणाच्या विरोधात उभी राहत आहे आणि अशा भूमिकेला पीसीसीएचएसएस कधीही समर्थन देणार नाही. बिल्डरांनी कार्यक्षम एसटीपी उभारल्याशिवाय कोणत्याही प्रकल्पाला पूर्णत्व किंवा भोगवटा प्रमाणपत्र देऊ नये."
>
> **- सत्यव्रत त्रिपाठी, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड चाकण हाऊसिंग सोसायटी संघटना**

संघटनेने स्पष्ट केले की, त्यांचा विरोध एसटीपीला नसून, सोसायटीचा ताबा देण्यापूर्वी कार्यक्षम एसटीपी उभारण्याची कायदेशीर जबाबदारी टाळणाऱ्या बिल्डर्सना आहे. पात्र गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये पूर्णपणे कार्यरत एसटीपी उभारणे, त्याची चाचणी घेणे आणि कार्यान्वित करूनच सोसायटीचा ताबा देणे ही बिल्डरची कायदेशीर जबाबदारी आहे. कार्यरत एसटीपीशिवाय कोणतेही पूर्णत्व प्रमाणपत्र (COMPLETION CERTIFICATE) किंवा भोगवटा प्रमाणपत्र (OCCUPANCY CERTIFICATE) देऊ नये, अशी संघटनेची ठाम मागणी आहे.

यावेळी संघटनेने "पीसीएमसीच्या चांगल्या कामात सोबत, चुकीच्या कामात विरुद्ध!" हे आपले ब्रीदवाक्यही पुन्हा अधोरेखित केले संघटनेचे सचिव प्रकाश जुंकटवार म्हणाले, "पर्यावरण संरक्षणाची सुरुवात सांडपाण्याच्या योग्य व्यवस्थापनापासून होते. प्रक्रिया न केलेले सांडपाणी नद्या आणि जलस्रोतांसाठी गंभीर धोका आहे. कार्यक्षम एसटीपी ही केवळ कायदेशीर अट नसून भविष्यातील पिढ्यांप्रती आपली सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक बिल्डरने सोसायटीचा ताबा देण्यापूर्वी कार्यरत एसटीपी उभारणे बंधनकारक केले पाहिजे."

याचबरोबर, पिंपरी चिंचवड चाकण हाऊसिंग सोसायटी संघटनेने सर्व गृहनिर्माण सोसायट्यांना आवाहन केले आहे की, बिल्डरने कार्यरत एसटीपी उभारून दिल्यानंतर तो नियमितपणे सुरु ठेवणे, त्याची योग्य देखभाल करणे आणि पर्यावरणपूरक सांडपाणी व्यवस्थापनाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासन, महानगरपालिका किंवा बिल्डर्सचीच जबाबदारी नसून प्रत्येक गृहनिर्माण सोसायटीचीही तितकीच नैतिक, सामाजिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. कार्यरत एसटीपी बंद ठेवणे किंवा त्याची योग्य देखभाल न करणे हे पर्यावरणाप्रती निष्काळजीपणाचे लक्षण आहे. सर्व सोसायट्यांनी पर्यावरणाच्या हितासाठी एसटीपी नियमितपणे कार्यरत ठेवावे, असे आवाहन संघटनेने केले आहे.

पिंपरी चिंचवड चाकण हाऊसिंग सोसायटी संघटनेने पर्यावरण संरक्षण, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि बिल्डर्सची जबाबदारी निश्चित करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी केली आहे. तसेच पर्यावरणाच्या हितासाठी घेतलेल्या प्रत्येक योग्य निर्णयाला संघटना पूर्ण पाठिंबा देईल, तर पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या कोणत्याही कृती किंवा भूमिकेला ठाम विरोध करेल, असेही स्पष्ट करण्यात आले.

# एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये डॉक्टर्स डे उत्साहात साजरा

## विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.



**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, भोसरी येथे विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे डॉ. रवींद्र पांडुरंग जांगळे (BDS), डेंटल केअर अँड इम्प्लांट सेंटर, तसेच श्री. स्वप्रील पांडुरंग गावळी, सौ. कोमल स्वप्रील गावळी, सौ. सुप्रिया मुळे आणि सौ. पल्लवी पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी डॉक्टरांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करणारी भाषणे, कविता, नृत्य, नाटिका तसेच आरोग्य, स्वच्छता व निरोगी जीवनशैलीवर आधारित विविध सादरीकरणे सादर केली. याशिवाय वर्गखोल्या, सॉफ्ट बोर्ड, रांगोळी आणि संपूर्ण शाळा परिसर आरोग्य जनजागृतीपर आकर्षक सजावटीने नटविण्यात आला.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य तपासणी शिबिर होय. या शिबिरात



विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच निरोगी जीवनशैली, वैयक्तिक स्वच्छता आणि दंत आरोग्याबाबत उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले.

शाळेचे प्राचार्य श्री. प्रवीण गायकवाड यांनी उपस्थित डॉक्टर व मान्यवरांचे आभार मानत विद्यार्थ्यांना निरोगी सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी एकता जाधव, तैसीन मुलाणी आणि पल्लवी पवार यांनी उपस्थित मान्यवर, शाळा व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे आभार मानले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैद्यकीय व्यवसायाविषयी आदराची भावना निर्माण झाली असून आरोग्य, स्वच्छता आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित झाले.





# समाविष्ट गावांतील अनधिकृत प्लॉटिंग आणि बेकायदा बांधकामांवर कारवाईचा इशारा

## 23 गावांचा कारभार पूर्णपणे पुणे महापालिकेकडे; आता मनपाच असणार नियोजन प्राधिकरण.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये काही व्यक्ती आणि विकसकांकडून पालिकेची कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता अनधिकृत प्लॉटिंग व बेकायदा इमारतींमधील सदनिकांची विक्री केली जात असल्याचे समोर आला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने नागरिकांना अशा अनधिकृत जागा किंवा सदनिका खरेदी न करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. अनधिकृत बांधकामे व प्लॉटिंग करणाऱ्यांवर पालिकेकडून कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पालिकेने दिला आहे.

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या ११ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार, २३ गावांचे नियोजन प्राधिकरण म्हणून आता पुणे महापालिकेची नियुक्ती करण्यात आली आहे. या पूर्वी या भागातील बांधकाम परवानगीचे कामकाज पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पाहिले जात होते. मात्र, आता हा सर्व कारभार पूर्णपणे पालिकेकडे आला आहे. जर कोणी अशा अनधिकृत प्लॉटिंगमधील भूखंड किंवा सदनिका खरेदी केल्यास, भविष्यात त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागू शकते.

यामध्ये प्रामुख्याने बांधकाम परवानगी न मिळणे, पाणीपुरवठा, ड्रेनेज, रस्ते आणि वीज यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित राहावे लागणे, संबंधित व्यवहारांमुळे भविष्यात मोठी कायदेशीर गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी कोणताही भूखंड अथवा सदनिका खरेदी करण्यापूर्वी, संबंधित जागेचा पुणे महापालिकेकडून मंजूर असलेला ले-आउट, विकास आराखडा (डीपी) आणि बांधकामाशी संबंधित सर्व आवश्यक कायदेशीर परवानग्यांची काटेकोर खात्री करूनच व्यवहार करावेत, असे आवाहनही पालिकेकडून करण्यात आले आहे.

म्हाळुंगे, सूस, बावधन (बु.), किरकटवाडी, पिसोळी, कोंढवे-धावडे, कोपरे, नांदेड, खडकवासला, मांजरी बुद्रुक, नऱ्हे, होळकरवाडी, औताडे-हांडेवाडी, वडाचीवाडी, शेवाळेवाडी, नांदोशी, सणसनगर, मांगडेवाडी, भिलारवाडी, गुजर निंबाळकरवाडी, जांभूळवाडी, कोळेवाडी आणि वाघोली.

अनधिकृत प्लॉटिंगमधील जागा, सदनिका खरेदी करू नये, तसेच अनधिकृत बांधकामामधील सदनिका खरेदी करू नये, अशा कोणत्याही प्रकारची माहिती आढळल्यास ती महापालिकेस कळवावी.



### नागरिकांनी माहिती द्यावी

» अनधिकृत प्लॉटिंग किंवा बेकायदा बांधकामांची माहिती नागरिकांनी तातडीने पुणे महापालिकेला द्यावी, असे आवाहन शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी केले आहे. म्हाळुंगे, सूस, बावधन, वाघोली, नऱ्हे, खडकवासला, मांजरी बुद्रुक, पिसोळीसह नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विकसक आणि संबंधितांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### अनधिकृत प्लॉटिंगवर पालिकेचा इशारा

» पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये परवानगीशिवाय प्लॉटिंग आणि सदनिकांची विक्री होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा अनधिकृत भूखंड किंवा फ्लॅट खरेदी करू नयेत, असे आवाहन महापालिकेने केले आहे. नियमबाह्य प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केल्यास भविष्यात बांधकाम परवानगी, मालकी हक्क आणि नागरी सुविधांबाबत गंभीर अडचणी निर्माण होऊ शकतात. अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विकसकांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

### खरेदीपूर्वी कागदपत्रांची खात्री करा

» कोणताही भूखंड किंवा सदनिका खरेदी करण्यापूर्वी संबंधित प्रकल्पाचा मंजूर ले-आउट, विकास आराखडा (डीपी), बांधकाम परवानगी आणि इतर आवश्यक कागदपत्रांची महापालिकेकडून खात्री करून घ्यावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. केवळ आकर्षक दर किंवा जाहिरातींना भुलून व्यवहार करू नयेत. अन्यथा पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा मिळण्यात अडचणी येऊ शकतात तसेच कायदेशीर वादांनाही सामोरे जावे लागू शकते.

# पीएमआरडीएचा मास्टरप्लॅन! अंतर्गत रिंगरोडसाठी 55 कोटी मंजूर; होणार 17 पूल अन् 12 किमीचे बोगदे

## पीएमआरडीएच्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात 55.03 कोटींची भांडवली तरतूद; 83.12 किलोमीटर लांबीच्या अंतर्गत रिंगरोडचे तांत्रिक अडथळे दूर.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) अंतर्गत रिंगरोडचे प्रत्यक्ष काम आणि प्राथमिक भूसंपादनासाठी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ५५.०३ कोटी रुपयांची भांडवली तरतूद केली आहे. ६५ मीटर रुंदीच्या या अत्याधुनिक मार्गावर प्रवाशांच्या सुविधेसाठी १२.६२ किलोमीटर लांबीचे बोगदे, १७ मोठे पूल आणि ९ उड्डाण पूल (इंटरचेन्जेस) उभारण्यात येणार आहेत. हा वर्तुळाकार मार्ग हिंजवडी आयटी पार्क,

चाकण एमआयडीसी आणि थेट लोहेगाव विमानतळाला जोडणार असल्याने दळणवळणाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तराचा होणार आहे. पुणे आणि पिंपरी- चिंचवडकरांचा प्रवास अधिक सुकर आणि गतिमान करण्यासाठी पीएमआरडीएने सकारात्मक पावले उचलली आहेत. गेल्या काही काळापासून प्रलंबित असलेल्या ८३.१२ किलोमीटर लांबीच्या अंतर्गत रिंग रोड प्रकल्पातील सर्व प्रशासकीय आणि तांत्रिक अडथळे दूर करण्यात पीएमआरडीएला मोठे यश आले आहे. पहिल्या टप्प्यानंतर तातडीने नगर रस्ता ते सातारा रस्ता दरम्यानच्या पुढील टप्प्यांचे काम हाती घेतले जाणार आहे. यासाठी हवेली तालुक्यातील कदमवाकवस्ती, वडाचीवाडी, पिसोळी, येवलेवाडी, गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, भिलारेवाडी, जांभूळवाडी आणि आंबेगाव खुर्द या ९ प्रमुख गावांसह एकूण १४ गावांच्या भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे

आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. सध्या अभियांत्रिकी विभागाने सुचवलेल्या आधुनिक तांत्रिक सुधारणांचे अवलोकन करून प्रकल्पाचा सविस्तर आराखडा युद्धपातळीवर अंतिम करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. प्रकल्पाला गती देण्यासाठी पीएमआरडीएने मोशी-आळंदी परिसरातील सोळू, निरगुडी आणि वढू खुर्द (वडगाव शिंदे) या प्राधान्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यातील ४.७० किलोमीटरच्या गावांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.



### दुसऱ्या टप्प्यात पुण्यातील कामे

» पहिल्या टप्प्यानंतर तातडीने नगर रस्ता ते सातारा रस्ता दरम्यानच्या पुढील टप्प्यांचे काम हाती घेतले जाणार आहे. यासाठी हवेली तालुक्यातील कदमवाकवस्ती, वडाचीवाडी, पिसोळी, येवलेवाडी, गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, भिलारेवाडी, जांभूळवाडी आणि आंबेगाव खुर्द या ९ प्रमुख गावांसह एकूण १४ गावांच्या भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या प्रकल्पासाठी ७२०.७८ हेक्टर खासगी जमिनीला सामाजिक प्रभाव मूल्यमापन (एसआयए) मधून शासनाने आधीच सूट दिल्यामुळे भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाला आहे.